# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./४८९/२००८

**परिपत्रक**

प्राचार्य / संचालक कला, संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र, अभियांत्रिकी व्यवस्थापन, औषध निर्माणशास्त्र, व तत्सम महाविद्यालये, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

स्थळ: - मुंबई.
दिनांक: ११ नोव्हेंबर, २००८.

प्राचार्य के. व्यंकटरमणि
कुलसचिव

## महाराष्ट्र शासन
## सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग,

एल्फीन्स्टन तंत्र विद्यालय आवार, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई - ४०० ००१.
इ-मेल jdhe_mumbai@rediffmail.com दुरध्वनी व फॅक्स क्र.: २२६५६६०० / २२६९१५२८

क्र. सहस/उशि/मुवि/अल्पसंख्याक/२००८-०९/३४३५ दिनांक: २१/१०/२००८

स्मरणपत्र - २ रे
(तात्काळ/प्राधान्याने)

प्रति,
१) कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.

विषय : अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना-२००८-०९
संदर्भ : मा. संचालक, उच्च शिक्षण, यांचे पत्र क्र. उशिस/पीएमएस/ २००८-०९/१४ अई/९९६, दिनांक : १०-१०-२००८.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय पत्रांचे प्राधान्याने अवलोकन व्हावे, सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षासाठी केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना राबविणे व नुतनिकरणासाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांनी सदर अर्ज शासनाच्या तसेच उच्च शिक्षण संचालनालय व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या वेबसाईट वरुन डाऊनलोड करुन संबंधीत महाविद्यालयाच्या/संस्थेच्या प्राचार्य मार्फत एकत्रित संकलित करुन त्यांनी संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यामार्फत हे एकत्रित अर्ज विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभाग यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. या बाबतचे कोण कोणत्या अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांचे अर्ज कोणाकडे सादर करावेत यासंबधी माहिती www.dirhe.org.in व www.dte.org.in.com. या संकेतस्थळावर उपलब्ध असून, सदर शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालय/संस्था स्तरावर स्विकारणे व त्यांचे कडून संबंधित विभागाच्या प्रमुखांमार्फत सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग व सहसंचालक, तंत्र शिक्षण, मुंबई विभाग यांना सादर करण्याच्या तारखा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

याबाबत मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी शासनाचे दिलेले निर्देशांचे पालन होण्याच्या दृष्टीने मा. संचालक, (व्यवसाय शिक्षण), मा. संचालक, (व्यवसाय, शिक्षण व प्रशिक्षण), तसेच शिक्षण निरिक्षक (दक्षिण/पश्चिम व उत्तर विभाग, मुंबई) तसेच शिक्षणाधीकारी (माध्यमिक) ठाणा, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे आणि आपल्या कार्यकक्षेतील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य/अधिव्याख्याता/संचालक/मुख्याधापक यांना तात्काळ निदर्शनास आणून अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना सन २००८-०९ ची अंमलबजावणी ठरवून दिलेल्या वेळेस पूर्ण करण्यासाठी आपल्या स्तरावरुन तातडीच्या तात्काळ सूचना दयाव्यात.

तसेच अपूर्ण भरलेले, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले किंवा विद्यार्थ्यांना परस्पर सादर केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याबाबतही सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत. मागील वर्षाप्रमाणे या वर्षी देखील काही संस्था/महाविद्यालयांचे प्रमुख हे अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारण्यास नकार देत असल्याच्या तक्रारी या विभागाकडे शासनाकडे प्राप्त झाल्या असून, विद्यार्थ्यांकडून अर्ज न स्विकारणाऱ्या संस्था/महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या विरोधात गंभिर स्वरुपात नोंद घेऊन कारवाई करण्यात येईल याचीही सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून पुढील कार्यवाही तात्काळ करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई

प्रत :

१) मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना माहितीस्तव प्रत सविनय सादर.

२) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई यांना माहितीस्तव सदर तसेच त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी आपल्या स्तरावरुन सर्व संबंधीत विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक, व्यवसाय शिक्षण सहसंचालक तसेच प्राचार्य, आय. टी. [illegible] या बाबत मा. संचालक, उच्च शिक्षण यांनी दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही तात्काळ होण्याच्या दृष्टीने तातडीच्या सुचना कृपया निर्गमीत कराव्यात ही विनंती.

३) शिक्षण निरिक्षण (दक्षिण/पश्चिम व उत्तर विभाग, मुंबई) तसेच शिक्षणाधीकारी (माध्यामिक) ठाणा, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे.